# प्रकरण - चौथे

## शेतमजुरांना मिळणारे उत्पन्न व शेतमजुरांचा खर्च

### (विभाग पहिला :- शेतमजुरांना मिळणारे उत्पन्न)

४.१.० :-

शेतमजुरांच्या उत्पन्नाची पहाणी करता असे दिसून येते की, शेतमजुरांना जमिनीपासून, स्वतःच्या मजुरीपासून, बायकोच्या, मुलांच्या, आई-वडिल, भाऊ-बहिण यांच्या शेतमजुरीपासून तसेच इतर मजुरीपासून, बैल-बैलगाडी भाडे व इतर उत्पन्न अशा बाबींपासून उत्पन्न मिळते.

शेतमजुरांना वरील सर्व बाबींपासून मिळणा-या उत्पन्नाची कल्पना आपणांस तक्ता ४.१, ४.२ व ४.३ वरून येते. विश्लेषणासाठी आपण शेतमजुरांना सर्व मार्गापासून मिळणा-या उत्पन्नाचे तीन वेगवेगळे विभाग करून त्यांना मिळणा-या उत्पन्नाचे विवेचन करु. या विवेचनासाठी ज्या वेगवेगळ्या बाबींपासून उत्पन्न मिळते त्या प्रत्येक बाबीपासून - (१) १,५०० रुपयापर्यंत उत्पन्न मिळणारे, (२) १,५०१ ते २,५०० रुपयापर्यंत व (३) २,५०१ रुपयापेक्षा जास्त उत्पन्न मिळविणारे असे तीन विभाग करून सर्व मजुरांना मिळणा-या उत्पन्नाचे पुढीलप्रमाणे विवेचन करता येईल.

... ६२/-

- तक्ता क्र· ४·१ -

## अल्पभूधारक उत्पन्नाच्या बाकी

| | उत्पन्नाच्या बाबी | ५०० रु· पेक्षा कमी | ५०१ रु· ते १००० रु· | १००१ रु ते १५०० रु· | १५०१ रु ते २००० रु· | २००१ ते २५०० रु· | २५०१ ते ३००० रु· | ३००१ रु ते ४००० रु· | ४००१ रु· पेक्षा जास्त | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | स्वतःच्या जमिनी पासून | १९<br>(२०·४३)<br>(४३·१८) | १३<br>(१३·९८)<br>(२०·६३) | ३५<br>(३७·६३)<br>(४०·७०) | २१<br>(२२·५८)<br>(३७·५०) | ५<br>( ५·३८)<br>( ९·८०) | | | | ९३<br>१०० %<br>(२७·२७) |
| शेती मजूरी पासूनचे उत्पन्न | स्वःताचे | | १<br>( १·०७)<br>( १·५९) | ६<br>( ६·४५)<br>( ६·९८) | १५<br>(१६·१३)<br>(२६·७९) | ३६<br>(३८·७१)<br>(७०·५९) | २३<br>(२४·७३)<br>(८५·१९) | १२<br>(१२·९०)<br>(९२·३०) | | ९३<br>१०० %<br>(२७·२७) |
| | बायकोचे | १<br>( २·१३)<br>( २·२७) | १२<br>(२५·५३)<br>(१९·०४) | २७<br>(५७·४५)<br>(३१·४०) | ५<br>(१०·६४)<br>( ८·९३) | २<br>( ४·२६)<br>( ३·९२) | | | | ४७<br>१०० %<br>(१३·७८) |
| | मुलाचे/मुलीचे | | ४<br>(२५·००)<br>( ४·३५) | १<br>( ६·२५)<br>( १·१६) | ६<br>(३७·५०)<br>(१०·७१) | २<br>(१२·५०)<br>( ३·९२) | २<br>(१२·५०)<br>( ७·४१) | १<br>( ६·२५)<br>( ७·७०) | | १६<br>१०० %<br>( ४·६९) |
| | भाऊ/बहीण | | १<br>(१४·२९)<br>( १·५९) | १<br>(१४·२९)<br>( १·१६) | ३<br>(४२·८६)<br>( ५·३६) | १<br>(१४·२९)<br>( १·९६) | १<br>(१४·२९)<br>( ३·७०) | | | ७<br>१०० %<br>( २·०५) |
| | आई/वडील | | ३<br>(५०·००)<br>( ४·७६) | १<br>(१६·६७)<br>( १·१६) | १<br>(१६·६७)<br>( १·७९) | १<br>(१६·६७)<br>( १·९६) | | | | ६<br>१०० %<br>( १·७६) |

| उत्पन्नाच्या बाबी | ५०० रु. पेक्षा कमी | ५०१ रु. ते १००० रु. | १००१ रु ते १५०० रु. | १५०१ रु. ते २००० रु. | २००१ ते २५०० रु | २५०१ ते ३००० रु. | ३००१ रु. ते ४००० रु. | ४००१ रु. पेक्षा जास्त | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| इतर मजुरी पासूनचे उत्पन्न | ८<br>(४०•००)<br>(१८•१८) | ८<br>(४०•००)<br>(१२•७०) | २<br>(१०•००)<br>( २•३३) | १<br>( ५•००)<br>( १•७९) | १<br>( ५•००)<br>( १•९६) | | | | २०<br>१०० %<br>( ५•८७) |
| बैलगाडी भाडे | | | १<br>(२०•००)<br>( १•१६) | २<br>(४०•००)<br>( ३•५७) | १<br>(२०•००)<br>( १•९६) | | | १<br>(२०•००)<br>१०० % | ५<br>१०० %<br>( १•४७) |
| इतर उत्पन्न | १६<br>(२९•६३)<br>(३६•३७) | २१<br>(३८•८९)<br>(३३•३३) | १२<br>(२२•२२)<br>(१३•९५) | २<br>( ३•७०)<br>( ३•५७) | २<br>( ३•७०)<br>( ३•९२) | १<br>( १•८५)<br>( ३•७०) | | | ५४<br>१०० %<br>(१५•८४) |
| एकूण | ४४<br>(१८•९०)<br>(१०० %) | ६३<br>(१८•४८)<br>(१०० %) | ८६<br>(२५•२२)<br>(१०० %) | ५६<br>(१६•४२)<br>(१०० %) | ५१<br>(१४•९६)<br>(१०० %) | २७<br>( ७•९२)<br>(१०० %) | १३<br>( ३•८१)<br>(१०० %) | १<br>( ०•३०)<br>(१०० %) | ३४१<br>१०० %<br>१०० % |

४.१.१ :-

अल्प भू-धारक शेतमजुरांना मिळणा-या उत्पन्नाची कल्पना आपणास तक्ता ४.१ वरून येते. अल्प भू-धारक शेतमजुरांना सर्व बाबीपासून मिळणा-या उत्पन्नाचे वरील तीन गटांमध्ये पुढीलप्रमाणे विवेचन करता येईल.

१.अे : स्वत:च्या जमिनीपासून मिळणारे उत्पन्न :-

स्वत:च्या जमिनीपासून उत्पन्न मिळविणा-यांमधील ६७ (७२.०४ टक्के) शेतमजुरांना १,५०० रुपयांपर्यंत, तर २६ (२७.९६ टक्के) शेतमजुरांना १,५०१ ते २,५०० रुपयापर्यंत उत्पन्न मिळते. कोणाही - शेतमजुराला २,५०१ रुपयापेक्षा जास्त उत्पन्न जमिनीपासून मिळत नाही.

१.बी : स्वत:चे शेतमजुरीपासून मिळणारे उत्पन्न :-

अल्प भू-धारक शेतमजुरांपैकी सात (७.५३ टक्के) शेतमजुरांना स्वत:च्या शेतमजुरीपासून १,५०० रुपयापर्यंत, एक्कावन्न (५४.८४ टक्के) शेतमजुरांना १,५०१ ते २,५०० रुपयापर्यंत तर पस्तीस (३७.६३ टक्के) शेतमजुरांना शेतमजुरीपासून २,५०१ रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न मिळते.

१.सी : स्त्रियांना शेतमजुरीपासून मिळणारे उत्पन्न :-

अल्प भू-धारक शेतमजुरांपैकी सत्तेचाळीस (५०.५४ टक्के) शेतमजुरांना स्त्रियांच्या मजुरीपासून उत्पन्न मिळते. स्त्रियांना - शेतमजुरीपासून मिळणा-या उत्पन्नापैकी चाळीस (८५.११ टक्के) स्त्रि कामगारांना १,५०० रुपयापर्यंत उत्पन्न मिळते. सात (१४.८९ टक्के) स्त्रि-

कामगारांना १,५०१ ते २,५०० रुपयापर्यंत उत्पन्न मिळते. शेतमजुरीपासून २,५०१ रुपयापेक्षा जास्त उत्पन्न कोणाही स्त्री कामगाराला मिळत नाही.

१डी : मुलामुलींच्या शेतमजुरीपासून मिळणारे उत्पन्न :-

अल्प भू-धारक शेतमजुरांपैकी सोळा (१७.२० टक्के) शेतमजुरांना मुलामुलींच्या शेतमजुरीपासून उत्पन्न मिळते. मुलामुलींना शेतमजुरीपासून मिळणा-या एकूण उत्पन्नापैकी पाच (३१.२५ टक्के) जणांना १,५०० रुपयापर्यंत, आठ (५० टक्के) जणांना १,५०१ ते २,५०० रुपयापर्यंत तर तीन (१८.७५ टक्के) मुलामुलींना २,५०१ रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न शेतमजुरीपासून मिळते. म्हणजेच शेतीतून मुलामुलींना स्त्रीयांपेक्षा जास्त मजुरी व उत्पन्न मिळते.

१ ई : बहिण-भाउ यांच्या शेतमजुरीपासून मिळणारे उत्पन्न :

सात (७.५३ टक्के) अल्प भू-धारक शेतमजुरांना बहिण-भाउ यांच्या शेतमजुरीपासून उत्पन्न मिळते. बहिण-भाउ यांना मिळणा-या एकूण शेतमजुरीपैकी दोन (२८.५७ टक्के) जणांना १,५०० रुपयापर्यंत, चार (५७.१४ टक्के) जणांना, १,५०१ ते २,५०० रुपयांपर्यंत तर एका (१४.२९ टक्के) व्यक्तीला २,५०१ रुपयापेक्षा जास्त उत्पन्न शेतमजुरीपासून मिळते.

१ एफ : आई-वडील यांच्या शेतमजुरीपासून मिळणारे उत्पन्न :-

अल्पभूधारक शेतमजुरांमधील सहा (६.४५ टक्के) शेतमजुरांना आई-वडीलांच्या शेतमजुरीपासून उत्पन्न मिळते. यापैकी चार व्यक्तींना (६६.६७ टक्के) १,५०० रुपयांपर्यंत तर दोन (३३.३३ टक्के) व्यक्तींना १,५०१ ते २,५०० रुपयापंत उत्पन्न मिळते.

१ जी : इतर मजुरीपासून मिळणारे उत्पन्न :-

वीस (२१·५१ टक्के) अल्पभूधारक शेतमजुरांना इतर मजुरीपासून उत्पन्न मिळते· इतर मजुरीपासून उत्पन्न मिळणा-या एकूण शेतमजुरांपैकी अठरा (९० टक्के) शेतमजुरांना १,५०० रुपयांपर्यंत तर दोन (१० टक्के) शेतमजुरांना १,५०१ ते २,५०० रुपयांपर्यंत उत्पन्न मिळते·

१ एफ·: बैल-बैलगाडी भाड्यापासून मिळणारे उत्पन्न :-

अल्पभूधारक शेतमजुरांपैकी पाच (५·३८ टक्के) शेतमजुरांना बैलगाडी भाड्यापासून उत्पन्न मिळते· या शेतमजुरांमधील एका (२० टक्के) शेतमजुराला १,५०० रु· पर्यंत तर तीन (६० टक्के) शेतमजुरांना १,५०१ ते २,५०० रुपयांपर्यंत तर दुस-या शेतमजुरास ४,००१ रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न बैलगाडी भाड्यापासून मिळते·

१ आय : इतर उत्पन्न :-

५४ (५८·०६ टक्के) शेतमजुरांना इतर उत्पन्न मिळते· यामध्ये शेळ्या-बक-या, भाई-म्हैशी, कोंबड्या किंवा शेतमजुरीव्यतिरिक्त मुलांमुलींकडून किंवा इतरांकडून मिळणा-या उत्पन्नाचा समावेश करण्यात आला आहे·

इतर मजुरीपासून उत्पन्न मिळविणा-या शेतमजुरांपैकी ४९ (९०·७४ टक्के) शेतमजुरांना १,५०० रुपयांपर्यंत, चार (७·४१ टक्के) जणांना १,५०१ ते २,५०० रुपयांपर्यंत, तर एका (१·८५ टक्के) शेतमजुराला २,५०१ रुपयापेक्षा जास्त उत्पन्न इतर मजुरीपासून मिळते·

१ जे : अल्प-भू-धारक शेतमजुरांना विविध मार्गापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे विश्लेषण केल्यास असे दिसून येते की स्वतःच्या व मुलामुलींच्या मजुरीपासून मिळणारे उत्पन्न काही प्रमाणात २,५०० रुपयापेक्षा जास्त आहे. बाकी सर्व प्रकारच्या उत्पन्नाची कमाल-मर्यादा २,५०० रुपये हीच आहे. स्त्रीयांना सर्वात कमी व मुलामुलींना मजुरीपासून जास्त उत्पन्न मिळते. इतर मजुरी व इतर उत्पन्न या मार्गांनी मिळणाऱ्या उत्पन्नाची वार्षिक मर्यादा अल्प आहे.

४·१२·० :

भूहीन शेतमजुरांना मिळणा-या उत्पन्नाची कल्पना तक्ता ४·२ वरुन येते· भूहीन शेतमजुरांना सर्व बाबींपासून मिळणा-या उत्पन्नाचे विवेचन पुढीलप्रमाणे करता येते -

२ अे : स्वत:चे शेतमजुरीपासूनचे उत्पन्न :-

शेतमजुरीपासून उत्पन्न मिळणा-या सर्व भूहीन शेतमजुरांपैकी कोणाही शेतमजुराला १,५०० रुपयापेक्षा कमी उत्पन्न मिळत नाही· सहा (२७·२७ टक्के) शेतमजुरांना, १,५०१ ते २,५०० रुपयांपर्यंत तर सोळा ७२·७३ टक्के) शेतमजुरांना २,५०१ रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न मिळते·

२ बी : स्त्रीयांचे शेतमजुरीपासून मिळणारे उत्पन्न :-

वीस (९०·९१ टक्के) भूहीन कुटुंबातील स्त्रीयांना शेतमुरीपासून उत्पन्न मिळते·

शेतमजुरीपासून उत्पन्न मिळविणा-या स्त्रीयांपैकी १८ (९० टक्के) स्त्रीकामगारांना १,५०० रुपयांपर्यंत तर दोन (१० टक्के) स्त्री शेतमजुरांना १,५०१ ते २,५०० रुपयांपर्यंत उत्पन्न मिळते·

२ सी : मुलामुलींच्या शेतमजुरीपासून मिळणारे उत्पन्न :-

भूहीन शेतमजुरांमधील पाच (२२·७३ टक्के) शेतमजुरांना मुलामुलींच्या शेतमजुरीपासून उत्पन्न मिळते·

शेतमजुरीपासून उत्पन्न मिळविणा-या मुलांमुलीमधील एक (२० टक्के) जणाला, १,५०० रुपयापर्यंत, तीन (६० टक्के) जणांना

UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

१,५०१ ते २,५०० रुपयापर्यंत तर दोन (४० टक्के) जणांना २,५०१ रुपयापेक्षा जास्त उत्पन्न मिळते·

२ डी : भाऊ-बहिणी यांच्या शेतमजुरीपासून मिळणारे उत्पन्न :-

चार (१८·१८ टक्के) भूहीन शेतमजुरांना बहीणी-भाऊ यांच्या शेतमजुरीपासून उत्पन्न मिळते· शेतमजुरीपासून उत्पन्न मिळविणाऱ्या व्यक्तीपैकी दोन (५० टक्के) जणांना १,५०० रुपयापर्यंत तर दोन (५० टक्के) जणांना १,५०१ ते २,५०० रुपयापर्यंत उत्पन्न मिळते·

२ ई : आई-वडीलांच्या शेतमजुरीपासून मिळाणारे उत्पन्न :-

भूहीन शेतमजुरांपैकी दोन (९·०९ टक्के) शेतमजुरांना आई - वडीलांच्या शेतमजुरीपासून उत्पन्न मिळते·

शेतमजुरीपासून उत्पन्न मिळविण्याऱ्या व्यक्तीपैकी १,५०० रुपयांपर्यंत व १,५०१ ते २,५०० रुपयांपर्यंत उत्पन्न मिळविणारी प्रत्येकी एक व्यक्ती आहे·

२ एफ : इतर मजुरीपासून मिळणारे उत्पन्न :-

भूहीन शेतमजुरांमधील सात (३१·८२ टक्के) शेतमजुरांना इतर मजुरीपासून उत्पन्न मिळते· पण ते १·५०० रुपयांपर्यंतच असते·

२ जी : इतर उत्पन्न :-

पंधरा (६८·१८ टक्के) भूहीन शेतमजुरांना इतर उत्पन्न मिळते· यापैकी चौदा (९३·३३ टक्के) शेतमजुरांना १,५०० रुपयापर्यंत तर एका (६·६७ टक्के) शेतमजुराला १,५०१ ते २,५०० रुपयापर्यंत उत्पन्न मिळते·

२ एप :

अल्पभूधारकांच्या तुलनेत (तक्ता ४·१) भूहीन शेतमजुरांना स्वतःच्या मजुरीपासून जास्त उत्पन्न मिळते· याचे कारण भूहीन शेतमजूर वर्षभर मजुरी करु शकतात· तर अल्पभूधारक स्वतःची जमीन कसून मजुरी करतात· त्या मानाने भूहीन शेतमजुरांच्या कुटुंबातील स्त्रिया, मुले-मुली, यांचे मजुरीपासून उत्पन्न मिळण्याचे प्रमाण कमी आहे· इतर मजूरीचे उत्पन्न फारच कमी आहे· कारण हे शेतमजूर मुख्यत्वे शेतमजुरीचें करतात·

४·१·३·०

खांडकरी शेतमजुरांना उत्पन्नाच्या सर्व बाबींपासून मिळणा-या उत्पन्नाची कल्पना तक्ता ४·३ वरून येते·

३ अे : खांडाच्या जमिनीपासून मिळणारे उत्पन्न :-

खांडाच्या जमिनीपासून उत्पन्न मिळणा-या पाच शेतमजुरांमधील तीन (६० टक्के) शेतमजुरांना १,५०० रुपयापर्यंत तर दोन (४० टक्के) शेतमजुरांना १,५०१ ते २,५०० रुपयापर्यंत उत्पन्न मिळते·

३ बी : स्वत:च्या शेतमजुरीपासून मिळणारे उत्पन्न :-

खांडकरी शेतमजुरांपैकी दोन (४० टक्के) शेतमजुरांना १,५०१ ते २·५०० रुपयांपर्यंत उत्पन्न मिळते तर तीन (६० टक्के) शेतमजुरांना २,५०१ रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न मिळते·

३ सी : स्त्रीयांच्या शेतमजुरीपासून मिळणारे उत्पन्न :-

खांडकरी शेतमजुरांमधील फक्त एका स्त्रीला शेतमजुरीपासून उत्पन्न मिळते व ते १,५०० रुपयांपेक्षा कमी आहे·

३ डी : मुलांच्या शेतमजुरीपासून मिळणारे उत्पन्न :-

खांडकरी शेतमजुरांची दोन मुले, शेतमजुरीपासून २,५०१ रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न मिळवितात·

३ ई : इतर मजुरीपासून मिळणारे उत्पन्न :-

छांडकरी शेतमजुरांपैकी एका शेतमजुराला इतर मजुरांपासून उत्पन्न मिळते· व ते १,५०० रुपयांपर्यंत आहे·

३ एफ् : बैल-बैलगाडी भाड्यापासून मिळणारे उत्पन्न :-

एकाच छांडकरी शेतमजुराला बैल-बैलगाडी भाड्यापासून १,५०१ ते २,५०० रुपयांपर्यंत उत्पन्न मिळते·

३ जी : इतर उत्पन्न :-

छांडकरी शेतमजुरांमधील दोन शेतमजुरांना इतर मार्गांनी १,५०० रुपयांपर्यंत उत्पन्न मिळते असे दिसून येते·

३ एच् :

अगोदरच्या दोन गटांच्या तुलनेने या गटात स्त्रीया, भाऊ-बहिण यांचे उत्पन्न कमी आहे· तर मुलांचे साधारणपणे तेवढेच आहे· - शेतमजुरीशिवाय इतर मार्गांनी मिळणारे उत्पन्न तुलनेने फारच कमी आहे·

## तक्ता क्र. ४.४

## शेतमजुरांचे शेतमजुरीचे दिवस

| अ.नं. | शेतमजुरांचे शेतमजुरीचे दिवस | अल्पभूधारक शेतमजूर | | भूमिहीन शेतमजूर | | खांडकरी शेतमजूर | | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | " |
| १. | १५० दिवस पर्यंत | ४ | ४.३० | - | - | - | - | ४ | ३.३३ |
| २. | १५१ ते २०० | २६ | २७.९६ | ५ | २२.७२ | २ | ४०.०० | ३३ | २७.५० |
| ३. | २०१ ते २५० | ४० | ४३.०१ | ५ | २२.७२ | १ | २०.०० | ४६ | ३८.३३ |
| ४. | २५१ ते ३०० | १९ | २०.४३ | १० | ४५.४५ | २ | ४०.०० | ३१ | २५.८३ |
| ५. | ३०१ पेक्षा जास्त | ४ | ४.३० | २ | ९.०९ | - | - | ६ | ५.०० |
| ६. | एकूण | ९३ | १०० % | २२ | १०० % | ५ | १०० % | १२० | १०० % |

४·२·० : मजुरीचे दिवस :-

शेतमजुरांच्या उत्पन्नाच्या विविध मार्गाचे व त्यांच्या तौलनिक महत्वाचे विश्लेषण मागील विभागात केलेले आहे· शेतमजुरांना वर्षाला किती दिवस काम मिळते याची कल्पना तक्ता क्रमांक ४·४ वरुन दिसून येते·

४·२·१ :

या तक्ता ४·४वरुन असे दिसते की, अल्पभूधारक शेतमजुरात कमी दिवस काम करणाऱ्यांचे प्रमाण भूहीन व खंडकरी शेतमजुरांपेक्षा जास्त आहे· १५१ ते २०० दिवस काम करण्यात खंडकरी शेतमजुरांचे प्रमाण जास्त तर २०१ ते २५० दिवस काम करणाऱ्या शेतमजुरांमध्ये अल्पभूधारक शेतमजुरांचे प्रमाण जास्त आहे· वर्षाला २५० ते ३०० व ३०१ पेक्षा अधिक दिवस काम करणाऱ्या शेतमजुरात भूहीन शेतमजुरांचे प्रमाण जास्त आहे· पहिल्या प्रकरणात शेतमजुरांना २५० ते २७७ दिवस वर्षात काम मिळते असे नमुद केले आहे· त्या मानाने कामेरी गावात शेतमजुरांना कामाचा पुरवठा चांगला होतो· असे म्हणावे लागेल·

४·२·२ :

तक्ता ४·४ चे उभे रकान्यातील आकडेवारीचे निरीक्षण केल्यावर असे दिसते की अल्पभूधारकात वर्षाला २०१ ते २५० दिवस शेतमजुरी करणाऱ्यांचे प्रमाण सर्वात जास्त आहे· म्हणजे त्यांना साधारणपणे आठ महिने शेतमजुरीचे काम मिळते· भूहीन शेतमजुरात २५० ते ३०० दिवस काम करणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे· म्हणजे त्यांना वर्षातून दहा महिने शेतमजुरीचे काम उपलब्ध होते· अभावाने का होईना पण यापेक्षा जास्त दिवस शेतकाम करणारे भूहीन शेतमजूर आहेत· खंडकरी

शेतमजुरात १५१ ते २०० व २५१ ते ३०० दिवस काम करणाऱ्यांचे प्रमाण सारखे आहे. खंडकरी शेतमजूर आपण खंडाने कसत असलेल्या जमिनीच्या आकारमानाप्रमाणे बाहेर काम शोधत असल्यामुळे ही तफावत दिसून येते. जास्त दिवस काम जसे कमी मजुरांना मिळते तसेच कमी कामही कमी मजुरांना मिळते.

## ४·३·० : शेतमजुरांना मिळणारे वेतन :-

शेतमजुरांना मिळणाऱ्या वेतनाचा विचार करता शेतमजुरांना, स्त्री कामगारांना, मुलांना मिळणाऱ्या वेतनाची कल्पना आपणास तक्ता ४·५ वरून येते·

शेतमजुरांना मिळणाऱ्या मजुरीच्या विवेचनामध्ये अल्पभूधारक, भूहीन व खंडकरी शेतमजूर यांना मिळणाऱ्या मजुरीचे विश्लेषण पुढील-प्रमाणे केले आहे·

### ३ अे : अल्पभूधारक शेतमजूर :-

अल्पभूधारक शेतमजुरामध्ये पुरुषांना मिळणाऱ्या वेतनामध्ये एक (१·०८ टक्के) शेतमजुराला वर्षात कमी म्हणजे आठ रुपये दैनंदिन मजुरी मिळते· तर सात (७·५३ टक्के) शेतमजुरांना सर्वात जास्त म्हणजे १५ रुपये मजुरी मिळते· ५५ (५९·४४ टक्के) शेतमजुरांच्या गटाला १० रुपये मजुरी मिळते· तर तीस (३२·२७ टक्के) मजुरांना दररोज बारा रुपये मजुरी मिळते·

स्त्रीयांना मिळणाऱ्या वेतनाचा विचार करता असे दिसून येते की, ४२ (८९·३६ टक्के) स्त्री कामगारांना सात रुपये तर पाच (१०·६४ टक्के) स्त्री कामगारांना ८ रु· मजुरी मिळते·

मुलांना मिळणाऱ्या वेतनामध्ये १० रुपये वेतन पंधरा (९३·४५ टक्के) जणांना तर बारा रुपये मजुरी एकजणास (६·२५ टक्के) मिळते·

एकूण स्त्री कामगारांच्या मजुरीचा दर बालमजुरांच्या मजुरीच्या दरापेक्षा बराच कमी आहे· मुलांना पुरुषांच्या मानाने चांगले वेतन मिळते·

३ बी : भूहीन शेतमजूर :-

भूहीन शेतमजुरांमधील पुरुषांना मिळणा-या वेतनाचा विचार केल्यास १० रुपये इतके कमी वेतन नऊ (४०·९१ टक्के) कामगारांना तर पंधरा रुपये इतके जास्त वेतन फक्त दोन (९·०९ टक्के) शेतमजुरांना मिळते· उरलेल्या पन्नास टक्के शेतमजुरांना बारा रुपये वेतन मिळते·

स्त्री शेतमजुरांना मिळणा-या वेतनापैकी सहा रुपये वेतन जे फारच अल्प आहे· ते एक (५ टक्के) स्त्री कामगाराला तर आठ रुपये मजुरी एका (५ टक्के) स्त्री कामगारास मिळते· उरलेल्या आठरा (९० टक्के) स्त्री शेतमजुरांना सात रुपये वेतन मिळते·

मुलांना मिळणा-या वेतनाचा विचार केल्यास आठ रुपयाइतके अल्प वेतन एका (११·११ टक्के) मुलांना तर बारा रुपये तीन (३३·३३ टक्के) शेतमजुरांना वेतन मिळते· तर उरलेल्या पाच (५५·५६ टक्के) मुलांना दहा रुपये मजुरी मिळते·

भूहीन शेतमजुरांमधील मुलांना व स्त्री मजुरांना फारच कमी वेतन मिळते·

३ सी : खंडकरी :-

खंडकरी शेतमजूर पुरुषांना मिळणा-या वेतनामध्ये दहा रुपये वेतन तीन (६० टक्के) शेतमजुरांना, पंधरा रुपये वेतन एका शेतमजुराला तर उरलेल्या एका (२० टक्के) शेतमजुराला बारा रुपये मजुरी मिळते·

सर्व खंडकरी स्त्री शेतमजूर कामगारांना सात रुपये इतकेच वेतन मिळते· तसेच या गटातील सर्व मुलांना दहा रुपये वेतन मिळते·

३ डी :

या विश्लेषणावरुन असे दिसून येते की महाराष्ट्र सरकारने वाळवा तालुक्यासाठी निर्धारीत केलेल्या दररोजच्या सोळा रुपये वेतन इतके कोणाही शेतमजुराला मिळत नाही. किमान मजुरी दराच्या कायद्याची सतत पायमल्ली होत असते. पण त्यात काहीजणांचे कमी तर काहीजणांचे जास्त शोषण होते. स्त्री मजुरांचे सर्वात जास्त शोषण होते. बालकामगार कायदाही असाच न पाळण्यात आनंद मानला जातो.

तक्ता ४.४ व ४.५ या दोहोंची तुलना करता असे दिसून येते की, कमी दिवस काम व कमी मजुरी दर यामुळे शेतमजुरांची आर्थिक परिस्थिती हलाखीची होत असावी.

४·४·० : शेतमजुरांचे उत्पन्न व खर्च यांची तुलना :-

शेतमजुरांना मिळणारे हे तुटपुंजे उत्पन्न आणि वाढती महागाई यामुळे संसार चालवताना शेतमजुरांची दमछाक होत असावी· त्यांचा खर्च व खर्चाचा उत्पन्नाशी बसणारा मेळ या संबंधीची आकडेवारी ४·६, ४·७ व ४·८ या तीन तक्त्यात मांडून त्याची चर्चा केली आहे·

४ अ : अल्पभूधारक शेतमजूर :-

तक्ता ४·६ मध्ये अल्पभूधारक शेतमजुरांचा होणारा खर्च व मिळणारे उत्पन्न या गोष्टी स्पष्ट होतात·

या तक्त्यातील कर्णावरील आकड्याचे निरीक्षण केले असतां उत्पन्नाच्या मर्यादेत रहाणा-या व मर्यादेच्या बाहेर रहावे लागणा-या शेतमजुरांची कल्पना येते· उदाहरणार्थ ३,००० रुपयापर्यंत उत्पन्न असणा-या दोन शेतमजुरांपैकी एकाचा खर्च त्याच्या उत्पन्नापलीकडे आहे· तर ३,००१ ते ३,५०० रुपये उत्पन्न गटात असणा-या चार शेतमजुरांपैकी एकाचा खर्च उत्पन्नाच्या बाहेर आहे· १००१ पेक्षा जास्त उत्पन्न व खर्च असणारे दोन अल्पभूधारक शेतमजूर त्यांचा खर्च उत्पन्नाच्या आत अथवा बाहेर आहे हे कळत नसल्यामुळे त्यांना वगळले तरी उरलेल्या ९१ शेतमजुरांपैकी ४४ (४८·३५) टक्के) शेतमजुरांचा खर्च त्यांच्या उत्पन्नात भागत नाही· विविध उत्पन्न गटात हे प्रमाण वेगवेगळे आहे· ४,५०१ ते ५,००० रुपयांच्या उत्पन्न गटात खर्च न भागणा-या शेतमजुरांचे प्रमाण ९१ टक्के आहे· तर ७,००१ ते ९,००० रुपये उत्पन्न गटात ते सर्वात कमी म्हणजे दहा टक्के आहे·

४ बी : भूहीन शेतमजूर :-

तक्ता ४·७ मध्ये भूहीन शेतमजुरांचा खर्च व त्यांचे उत्पन्नाशी असलेले संबंध स्पष्ट केले आहेत·

या गटाती ल बावीस शेतमजुरांपैकी पंधरा (७५ टक्के) जणांचा खर्च त्यांच्या उत्पन्नाबाहेर आहे· म्हणजे अल्पभूधारक शेतमजुरांच्या मानाने हे प्रमाण जास्त आहे ३,५०१ ते ४,००० रुपये ४,५०१ ते ५००० रुपये, ६००१ ते ६·५०० रुपये, ६,५०१ ते ७,००० रुपये या चार उत्पन्न गटातील सर्व लोकांचा खर्च त्यांच्या उत्पन्नापेक्षा जास्त आहे· तर ७,००१ ते ९,०० रुपये या उत्पन्न गटात खर्च उत्पन्नापेक्षा जास्त असणा-यांचे प्रमाण ३३ टक्के इतके आहे·

## तक्ता क्र· ४·८

### खांडकरी शेतमजूर उत्पन्न खर्च तुलना

| अ· नं· | वार्षिक उत्पन्न / वार्षिक खर्च → (रुपये) | ४००१ ते ४५०० | ५००१ ते ५५०० | ७००१ ते ९००० | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १· | ५००१ ते ५५०० | १ | | | १ (१००%) (२०·००) |
| २· | ५५०१ ते ६००० | | १ | | १ (१००%) २०·००) |
| ३· | ७००१ ते ९००० | | | ३ | ३ (१००%) (६०·००) |
| ४· | एकूण | १ (२०·००) (१००%) | १ (२०·००) (१००%) | ३ (६०·००) (१००%) | ५ |

४ सी : खंडकरी शेतमजूर :-

सर्वेक्षणामध्ये समाविष्ट असलेल्या पाच शेतमजुरांच्या खर्चाची उत्पन्नाच्या संदर्भातील आकडेवारी तक्ता ४.८ मध्ये दिलेली आहे.

या तक्त्यातील वर्गावरील आकड्यांच्या वाचनातून एक गोष्ट स्पष्ट होते की सर्व खंडकरी शेतमजुरांचा खर्च त्यांच्या उत्पन्नातच भागतो.

अल्पभूधारक, भूहीन, व खंडकरी शेतमजूर या तीन्ही गटातील शेतमजुरात खंडकरी शेतमजुरांची आर्थिक स्थिती व व्यवहार कुशलता अगोदरच्या दोन गटातील शेतमजुरांपेक्षा जास्त चांगली आहे.

या प्रकरणात या अभ्यास केलेल्या शेतमजुरांच्या आर्थिक बाबीवरुन केलेल्या विश्लेषणावरुन असे दिसून येते की स्त्री मजुरांचे जमीन मालकाकडून सर्वात जास्त शोषण होते. बालमजूर कामगारांना कामावर न घेण्याचा आदेश असून सुध्दा बालमजुरांना कामावर ठेवले जाते. आणि स्त्रीयांच्या तुलनेने त्यांची पिळवणूक कमी होते. कोणाही शेतमजुराला किमान मजुरी नियमाने ठरवून दिलेली मजुरी मिळत नाही.

शेतमजुरांना कामेरी गावात गरजेपुरते दिवस वर्षभर काम मिळते. खंडकरी शेतमजूर वगळता अल्पभूधारक शेतमजुरांमध्ये ४८ टक्के व भूहीन शेतमजुरांमध्ये ७५ टक्के शेतमजुरांचे प्रापंचीक खर्च त्यांच्या उत्पन्नाबाहेर आहे.

....८९/-